# चोवीस तासांमध्ये मेट्रो-३ मार्गिकेचे चोवीस मीटरचे भुयारीकरण

**मुंबई : प्रतिनिधी**

कुलाबा- वांद्रे- सीप्झ या मार्गावर मेट्रो-३ मार्गिकेचे भुयारी काम सुरू आहे. या प्रकल्पाच्या पॅकेज दोन अंतर्गत आझाद मैदान ते ग्रँट रोड या टप्प्यामध्ये अवघ्या २४ तासांमध्ये २४ मीटर टनेलिंगचा नवा विक्रम मुंबई मेट्रो-३ च्या टीमने केला आहे.

मेट्रो-३ मार्गिकेच्या भुयारीकरणाचे काम मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फत (एमएमआरसी) सुरू आहे. या कामाच्या पॅकेज २ मध्ये आत्तापर्यंत १.७४ किलोमीटर इतके टनेलिंगचे काम पूर्ण करण्यात आले आहे. या पॅकेजअंतर्गतच्या कामात निर्माण झालेले डेब्रिज महापे एमआयडीसी आणि अंबरनाथ येथे विल्हेवाट लावण्यासाठी पाठवण्यात येत आहे. आतापर्यंत २.२७ लाख क्युबिक मीटर इतके डेब्रिज निर्माण झालेला आहे.

संपूर्ण शहरात आता १७ टनेल बोरिंग मशीनमार्फत पूर्ण क्षमतेने कामाला सुरुवात झाली आहे. आतापर्यंत बारा किलोमीटरचे टनेल बोरिंगचे काम पूर्ण करण्यात आले आहे. एकूण ५२ किलोमीटर अंतरापैकी १२ किलोमीटरच्या अंतरातच टनेलिंगचे काम पूर्ण झाले आहे. उरलेल्या जागा या स्थानकांच्या बांधणीसाठी वापरण्यात येणार आहेत.